जलस्वराज्य - २ कार्यक्रम.
शहरालगतच्या गावांच्या पाणी पुरवठा योजनेंच्या जलमापक खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत **"राज्यस्तरीय जलमापक निविदा सल्लागार समिती"** स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०११८/ प्र. क्र. ०२/ पापु-११
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१
तारीख : १६ मार्च, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-१२१३ / प्र. क्र. २०० / पापु-११, दि. ०४/०१/२०१४.
२) शासन निर्णय क्रमांकः जस्वका-०५१५/प्र.क्र.८५/वि.सं.क. (तां)/पापु-११, दि. ४/६/२०१५.
३) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०२१४ / प्र. क्र. ५५ / पापु-११, दि. १८/०२/२०१७.

प्रस्तावना :

जलस्वराज्य-२ हा जागतिक बँक अर्थसहाय्यित कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये मुख्य भौतिक गुंतवणूक करण्यात येत असून ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता याबाबत या क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचावणे तसेच शहरालगतच्या, टंचाईग्रस्त व पाणी गुणवत्ताबाधित भागांमध्ये गुणवत्तापूर्ण व शाश्वत पाणी पुरवठा सेवा पुरविणे, हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमांतर्गत जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य हे Program for Results (PforR) या वित्तिय साधनांतर्गत उपलब्ध होणार असून ते उद्दीष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी (Disbursement Linked Indicators - DLIs) निगडीत आहे. PforR या तत्त्वावर आधारित असा हा देशातील पथदर्शी कार्यक्रम आहे.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे, गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत करुन वाढीव दर्जाच्या शाश्वत पाणी पुरवठा व्यवस्थेचे प्रयोगनिर्देशन (Demonstration) करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, पाणी पुरवठा योजनेसाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची निवड सूची करणे, तांत्रिक बाबीं विषयक धोरणात्मक निर्णय घेणे व एकंदर शासनाच्या धोरणात सुसूत्रता आणणे इ. बाबींसाठी जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत संदर्भ क्र. २ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे. दि. २०/९/२०१६ रोजी सदर समितीची जलमापक खरेदी करण्याबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये योजनेत वापरण्यात येणाऱ्या जलमापकाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला होता.

१. जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये आंतरराष्ट्रीय मानकांची स्वयंचलित मीटर रिडींग जलमापके बसविणे.

२. जलमापकांची राज्यस्तरावर एकत्रितपणे खरेदी करण्यासाठी निविदा मागवून दर करार करणे.

३. योजनांमध्ये बसविण्यात येणाऱ्या जलमापकाच्या किंमतीमधील काही हिस्सा नळ जोडणी धारकाकडून घेणे.

३. उपरोक्त मुद्दा क्र. २ मधील बाबींस अनुसरुन जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांसाठी जलमापके खरेदी करण्याबाबत शासन स्तरावर **“राज्यस्तरीय जलमापक निविदा सल्लागार समिती”** गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेली बाब विचारात घेता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अखत्यारित जलस्वराज्य -२ कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शहरालगतच्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी जलमापकांची खरेदी करण्याकरिता सुधारणा सहाय्य व प्रकल्प

व्यवस्थापन कक्ष स्तरावर **"राज्यस्तरीय जलमापक निविदा सल्लागार समिती"** गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

समितीची रचना :-

१.	**उप सचिव तथा प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**	**अध्यक्ष**
२.	**प्रकल्प व्यवस्थापक, सु. स. व प्र. व्य. कक्ष, नवी मुंबई**	**सदस्य**
३.	**संचालक (पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था), नवी मुंबई**	**सदस्य**
४.	**वित्त नियंत्रक, सु. स. व प्र. व्य. कक्ष, नवी मुंबई**	**सदस्य**
५.	**अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे**	**सदस्य**
६.	**अवर सचिव, सु.स.व प्र. व्य. कक्ष, (पापु-११), नवी मुंबई**	**सदस्य सचिव**

समितीची कार्यकक्षा :-

१. योजनेत बसवावयाच्या जलमापकांचे तंत्रज्ञान व मानांकन याबाबत सल्ला देणे.

२. प्रारुप निविदा मंजूर करणे.

३. निविदा प्रसिध्द करणे.

४. निविदा समितीने वेळोवेळी दिलेल्या सल्लयानुसार कार्यवाही करणे.

समितीची कार्यप्रणाली :-

१. **राज्यस्तरीय जलमापक निविदा सल्लागार समिती ही "राज्यस्तरीय निविदा समिती"** यांच्या अधिपत्याखाली काम करेल.

२. बैठकीतील विषयानुरुप आवश्यकतेनुसार शासकीय अधिकारी / अशासकीय सल्लागार / विशेष तज्ञास अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने विशेष निमंत्रित म्हणून बोलविण्यात येईल.

समितीचा कालावधी :-

- राज्यस्तरीय निविदा सल्लागार समितीचा कालावधी समिती गठीत झाल्यापासून उद्दिष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशांक (DLI) क्र. ४ ची पुर्तता होईपर्यंत असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१४१३१८१४२३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Krishna More
Digitally signed by Chandrakant Krishna More
Date: 2018.03.16 18:02:30 +05'30'

(चं.कृ.मोरे)
शासनाचे अवर सचिव

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व) मंत्रालय, मुंबई.
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१३. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
१४. जिल्हाधिकारी (सर्व)
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१८. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९. पा. पु. व स्व. विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती (कार्यासन पापु-११)